महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई. ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२
Website:-www.doa.maharashtra.gov.in Email:-dirdoa.mum-mah@gov.in/directorateofart@gmail.com

क्रमांक:-डिओअे-२०२३/दोन/२०४२ दिनांक :- ७ ऑगस्ट, २०२३

## परिपत्रक

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेबाबत कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या दिनांक २७ जुलै, २०२३ च्या प्रसिध्दी पत्रकान्वये ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा कालावधी दिनांक २४/०७/२०२३ ते दिनांक ०४/०८/२०२३ प्रसिध्द करण्यात आला होता. त्यानुसार या कालावधीत संस्थांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे व विद्यार्थ्यांचा JOINING रिपोट भरणे आवश्यक होते. तथापि, काही संस्थांकडून दिनांक ०४/०८/२०२३ पर्यंत ONLINE रजिस्ट्रेशन केलेले तसेच विद्यार्थ्यांचा JOINING रिपोर्ट भरलेला दिसून येत नाही.

जोपर्यंत संबंधित कला संस्था JOINING रिपोर्ट ONLINE SUBMIT करत नाही. तोपर्यंत संबंधित संस्थांना संस्था स्तरावरील ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया राबविता येणार नाही. तरी संबंधित संस्थांनी ONLINE रजिस्ट्रेशन करुन, JOINING रिपोर्ट **मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** ONLINE SUBMIT करावा. ज्या संस्था ऑनलाईन JOINING रिपोर्ट भरणार नाहीत. त्या संस्थांचे प्रवेश ग्राहय धरले जाणार नाही. याची गांर्भियाने दखल घेण्यात यावी.

सही/-
( राजीव मिश्रा )
कला संचालक
कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रति,
प्राचार्य, संबंधित शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्था.
प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१.निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
यांना कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेले नाही. तसेच ज्या संस्थांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करुन, ऑनलाईन रिपोर्ट सादर केलेला नाही. अशा संस्थांशी संपर्क साधून ऑनलाईन रजिस्ट्रेशन व ऑनलाईन रिपोर्ट सादर करण्याबाबत संबंधित संस्थांना सुचना देण्यात याव्यात.
२. परीक्षा नियंत्रक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. सहायक निरीक्षक,चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय, मुंबइ, औरंगाबाद व नागपूर.
४. निवड नस्ती.